शासन मान्य
प्रयत्न आमचे, विश्वास तुमचा...
दारू सोडवा
हमखास!
सिगारेट / गुटखा / गांजा / मावा सोडवा
(न सांगता किंवा सांगून सोडवा)
जनसेवा व्यसनमुक्ती केंद्र
डॉ.विलास पाठक : 8308113114, 9422240654
वेळ : सकाळी १० ते सायंकाळी ६
पत्ता: शिवाजी महाराज शॉपिंग सेंटर अलीपुर रोड बार्शी

दैनिक सोलापूर
असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये
Email - katusatya@gmail.com
दीपावलीच्या तमाम जनतेस हार्दिक शुभेच्छा !

लक्ष्मी लॉन्स मंगल कार्यालय
फक्त ५१०००/- रु.
जेवणासह (अटी लागू)
• निसर्गरम्य हवेशिर वातावरण • पाण्याची भरपूर सोय • जेवणासाठी स्वतंत्र हॉल • वधू-वरांना स्वतंत्र रूम्सची सोय • २४ तास लाईटची सोय
श्री स्वामी समर्थ सेवा आश्रम ट्रस्ट
अक्कलकोट-सोलापूर एन.एच.रोड, अक्कलकोट
मो. ९३२६१५८१५१ / ८६२५००५१११

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष १९ वे, अंक ११५ वा | रविवार, दि. ०१ डिसेंबर २०२४ | पाने ४ | पोष्ट परवानाः - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

विकणे आहे
वासूद रोड वरील पाण्याच्या टाकीच्या उत्तरील बाजूस असणाऱ्या शिनगारे प्लॉट मधील क्लिअर टायटल प्रॉपर्टी (ट्वीन बंगलो) विकणे आहे.
संपर्क : डी. बी. शिंदे
मो.: ९५७९४२१४६५
८२७५२७४३५३
पत्ताः अल्टिमेट जिमच्या समोर, सांगोला

# सोलापूर जिल्ह्याच्या वाट्याला यंदा तरी मंत्रिपद येणार का?



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्ह्यात विधानसभा निवडणुकीचा निकाल लागल्यानंतर सोलापूर जिल्ह्याला उत्सुकता लागली आहे, ती मंत्रिपदाबाबत, जिल्ह्यात महायुतीचे वर्चस्व असूनही मागच्या मंत्रिमंडळात एकही मंत्रिपद मिळाले नव्हते.

यंदा पुन्हा जिल्ह्यात सर्वाधिक ५ जागा भाजपने मिळवल्या आहेत. त्यामुळे सोलापूर जिल्ह्याला यंदातरी मंत्रिपद मिळणार का आणि कोणाला, याकडे लक्ष लागले आहे.

सोलापूर जिल्ह्यात विधानसभेचे ११ मतदार संघ आहेत. यंदाच्या निवडणुकीत भाजपने सर्वाधिक ५ जागा मिळवल्या आहेत. त्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसने (शरदचंद्र पवार गट) ४ आणि शेतकरी कामगार पक्ष आणि शिवसेनेने (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट) प्रत्येकी १ असे पक्षीय बलाबल आहे.

भाजपमध्ये सोलापूर शहर उत्तरचे आमदार विजयकुमार देशमुख हे सलग पाचव्यांदा निवडून आले आहेत. माजीमंत्री आमदार सुभाष देशमुख हेही सोलापूर दक्षिण मतदार संघातून सलग तीनवेळा निवडून आले आहेत.

तर भाजपचे जिल्हाध्यक्ष आणि अक्कलकोटचे आमदार सचिन कल्याणशेट्टी, पंढरपूरचे आमदार समाधान आवताडे हे दुसऱ्यांदा तर सोलापूरमध्यमध्ये देवेंद्र कोठे हे पहिल्यांदाच निवडून आले आहेत. या भाजपच्या ५ आमदारापैकी सध्या तरी ज्येष्ठ आमदार म्हणून दोन्ही देशमुखांचे पारडे जड आहे.

या आधी दोन्ही देशमुखांना मंत्रिपदाची संधी मिळालेली आहे. सुभाष देशमुख हे सहकार व पणनमंत्री म्हणून कॅबिनेट मंत्री होते, तर विजयकुमार देशमुख परिवहन राज्यमंत्री होते.

आता पुन्हा दोघांपैकी कोणाला संधी मिळणार की नवीन चेहरा म्हणून भाजपचे जिल्हाध्यक्ष सचिन कल्याणशेट्टी यांना पसंती दिली जाते, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

# मोदींच्या उपस्थितीत 5 तारखेला शपथविधी सोहळा पण CM पदाचं नाव अजूनही गुलदस्त्यात



**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** विधानसभा निवडणुकीचा निकाल लागून आठवडा उलटला तरी मुख्यमंत्रीपदाचा पेच कायम आहे. अशातच आता राज्यातील नव्या सरकारचा शपथविधी सोहळा 5 डिसेंबरला होणार असल्याची माहिती समोर येत आहे.

राज्यातील विधानसभा निवडणुकीचा निकाल 23 नोव्हेंबर रोजी जाहीर झाला. या निकालात भाजपच्या नेतृत्वाखालील महायुतीला मोठे यश मिळालं. मात्र, महायुतीकडून सत्ता स्थापनेचा दावा करण्यात आला नव्हता. आता 5 तारखेला शपथविधी होणार आहे.

विधानसभा निवडणुकीचे निकाल लागून आठ दिवस उलटले तरीही सरकार स्थापन झालेले नाही. राज्यात महायुतीला स्पष्ट बहुमत मिळाले असले तरी मुख्यमंत्री कोण होणार याबाबत अद्याप निर्णय झालेला नाही. महाराष्ट्रात सत्ता स्थापनेचा तिढा संपता संपत नाही, अशातच भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळेंनी महाराष्ट्रातील नव्या सरकारच्या शपथविधीची तारीख निश्चित झाल्याची माहिती दिली. महायुती सरकारचा शपथविधी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत होणार आहे. 5 डिसेंबरला संध्याकाळी ५ वाजता आझाद मैदानवर हा शपथविधी सोहळा संपन्न होणार असल्याची माहिती बावनुकळेंनी एक्स अकाऊंटवर दिली.

5 डिसेंबर रोजी महाराष्ट्रातील नवीन सरकारच्या शपथविधीला सर्व आमदारांनी उपस्थित राहावे, अशा सूचना बावनकुळेंनी दिल्यात.

या शपथविधी सोहळ्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आणि इतर राज्यांच्या मुख्यमंत्र्यांसह एनडीएचे महत्त्वाचे नेतेही उपस्थित राहणार आहेत. राज्यातील विधानसभा निवडणुकीत महायुतीने 288 पैकी 235 जागा जिंकल्या आहेत. भाजपने सर्वाधिक 132 जागा जिंकल्या. एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेने 57 जागा जिंकल्या, तर अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने 41 जागा जिंकल्या. भाजप महायुतीत मोठा पक्ष ठरल्याने मुख्ममंत्रीपद भाजपकडे जाण्याची शक्यता आहे.

### 15 ते 16 हजार पासची व्यवस्था

तसेच प्रत्येक जिल्ह्यातील भाजपचे प्रमुख पदाधिकारी शपथविधी सोहळ्यात सहभागी होणार आहेत. यावेळी आझाद मैदानात ज्यांना सुरक्षेच्या कारणास्तव पास देण्यात आला आहे, त्यांनाच प्रवेश दिला जाईल. महायुतीच्या शपथविधी सोहळ्यासाठी विशेष पासची सुविधा उपलब्ध असणार आहे. सुमारे 15,000 ते 16,000 पासेसची व्यवस्था करण्यात आली आहे.

### मुख्यमंत्रीपदाची शपथ कोण घेणार?

एकीकडे मुख्यमंत्रीपदासाठी देवेंद्र फडणवीस यांच्या नावाची चर्चा होत असताना आता नवा फॉर्म्युला समोर आला. सुरूवातीचं एक वर्ष मुख्यमंत्री म्हणून एकनाथ शिंदेच राहतील, अशी शक्यता वर्तवण्यात आली. या माहितीला भाजपने दुजोरा दिला आहे. एकनाथ शिंदे यांच्या चेहऱ्यावर आणि त्यांच्यात नेतृत्वात निवडणूक लढवली गेली. मतदारांनी त्यांना कौल दिल्याने एकनाथ शिंदे हे एक वर्ष मुख्यमंत्री राहतील, अशी भाजपमध्ये चर्चा सुरू आहे. जनमताचा अनादर होऊ नये, यासाठी भाजपचे काही ज्येष्ठ नेते ही भूमिका घेत असल्याचे समोर आले आहे. त्यामुळं आगामी काळात राज्याच्या मुख्यमंत्रिपदी कोण विराजमान होणार, हेच पाहणं महत्वाचं आहे.

# निवडणुकीत पैशांचा धुमाकूळ
## ९५ वर्षीय बाबा आढाव EVM विरोधात मैदानात!



**पुणे (कटूसत्य वृत्त):-** ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते बाबा आढाव मागील तीन दिवसांपासून आत्मक्लेश आंदोलन करत होते. त्यांच्या भेटीसाठी पुण्यात अजित पवार दाखल झाले होते. त्यानंतर उद्धव ठाकरे, जयंत पाटील, संजय राऊत हे बाबा आढावांच्या भेटीसाठी दाखल झाले. यावेळी बाबा आढाव यांनी उद्धव ठाकरेंच्या हस्ते पाणी पिऊन उपोषण मागे घेतलं.

राज्यातील विधानसभा निवडणुकीत पैशांच्या मोठ्या प्रमाणातील वापराविरोधात त्यांनी आंदोलन, उपोषण केलं होतं. उद्धव ठाकरे आणि महाविकास आघाडीने हे आंदोलन पुढे घेऊन जावं, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. उद्धव ठाकरेंच्या उपस्थित, त्यांच्या हस्ते पाणी पिऊन त्यांनी उपोषण सोडलं. बाबा आढाव यांनी उपोषण मागे घेतल्यानंतर उद्धव ठाकरेंनी त्यांची प्रतिक्रिया दिली. एवढ्याशा आंदोलनाने काय होणार असं कोणाला वाटत असेल, तर वणवा पेटवायला एक ठिणकी कारणीभूत असते आणि ती ठिणगी आज पडलेली आहे, अशा शब्दांत उद्धव ठाकरेंनी या आंदोलनावर भाष्य केलं आहे.

### काय म्हणाले उद्धव ठाकरे?

तुम्ही म्हातारपण स्वीकारायला तयार नाहीत, आजही तुम्ही आम्हाला प्रेरणा देता. माझं मत आहे प्रेरणा कधीच म्हातारी होऊ शकत नाही, अशी प्रतिक्रिया उद्धव ठाकरे यांनी बाबा आढावांबद्दल दिली.

पुढे ते म्हणाले, 'एक सरकारी ताफा आता इथून गेला. महत्त्वाचा मुद्दा हा की जिंकलेले सुद्धा इथे येत आहेत आणि आम्ही हारलेले सुद्धा इथे येतोय. थोडक्यात या निकालावर ना हारलेल्यांचा विश्वास आहे ना जिंकलेल्यांचा विश्वास आहे. जिंकले त्यांना धक्का आहे की आम्ही जिंकलो कसे आणि आम्ही हारलो आम्हाला धक्का बसला आहे की आम्ही हरलो कसे. याच कारण स्पष्ट आहे. जे आमच्याकडून वधवून घेतलं, सत्यमेव जयते, आता सत्तामेव जयते सुरू झालं आहे आणि त्याच्याविरोधात आपण उभे राहिलो आहोत', असं म्हणत उद्धव ठाकरेंनी महायुतीवर तोफ डागली.

(पान 2 वर..)

# सोलापुरात 'ईव्हीएम' विरोधात मोठं पाऊल
## मारकडवाडी स्वखर्चाने 'बॅलेट'वर पुन्हा घेणार मतदान




**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** संपूर्ण राज्यभरात विरोधी पक्षाने ईव्हीएमच्या विरोधात रान उठवले आहे. विधानसभा निवडणुकीत मतदानाची वेळ संपल्यानंतर तब्बल ७५ लाख मतदान वाढल्याचा विरोधकांचा आरोप आहे. सोलापूर जिल्ह्यातही विरोधकांकडून 'ईव्हीएम'वर संशय व्यक्त करत सत्ताधारी उमेदवारांना मिळालेली मते यावर आक्षेप घेण्यात येत आहे. माळशिरस तालुक्यातील मारकवाडी गावाने भाजपचे राम सातपुते यांना मिळालेल्या मतांवर आक्षेप घेत बॅलेट पेपरवर विधानसभेप्रमाणे मतदान घेण्याची तयारी दाखवली आहे. त्या संपूर्ण प्रक्रियेचा खर्च करण्याची तयारीही गावाने दाखवले आहे, त्यामुळे प्रशासन बॅलेट पेपरवर पुन्हा विधानसभा प्रक्रियेप्रमाणे मतदान घेण्याची परवानगी देणार का, हा खरा प्रश्न आहे.

महाविकास आघाडी विशेषतः काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने सत्ताधारी महायुतीच्या उमेदवारांना मिळालेल्या मतांवर आक्षेप घेत ईव्हीएमच्या विरोधात विविध मार्गाने आवाज उठवला आहे. महाविकास आघाडीच्या राज्यभरातील अनेक उमेदवारांनी पैसे भरून फेरमतमोजणीची मागणी केली आहे. अनेक जण न्यायालयात जाण्याच्या तयारीत आहेत.

सोलापूर जिल्ह्यातील सोलापूर शहर मध्य मतदारसंघातील मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे उमेदवार, माजी आमदार नरसय्या आडम यांनी तर मतदासंघातील विधानसभेची निवडणूक रद्द करण्यात यावी, अशी मागणी केली आहे. त्यामुळे पहिल्या दिवसापासून ईव्हीएमच्या विरोधात विरोधकांकडून रान उठवले जात आहे. माळशिरस तालुक्यातील मारकवाडी गावात एकूण 2300 मतदानापैकी 1905 मतदान झाले आहे. मतमोजणीत भाजपचे उमेदवार राम सातपुते यांना मताधिक्य मिळाले आहे. मात्र, ग्रामस्थांनी भाजपचे उमेदवार राम सातपुते (सुमारे 1000) यांना मिळालेल्या मतांवर आक्षेप घेतला आहे. जानकर यांना मानणाऱ्या या गावात सातपुते यांना मताधिक्क मिळणं अशक्य असल्याचे म्हटले आहे. त्यावरून गावकऱ्यांनी फेरमतदानाची मागणी केली आहे.


# परीक्षा १० डिसेंबरपासून, निकाल १५ दिवसांत!



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** विधानसभा निवडणुकीमुळे पुढे ढकलण्यात आलेली पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाची सत्र परीक्षा आता १० डिसेंबरपासून सुरू होणार आहे. १५ दिवसांनी परीक्षा पुढे गेल्याने निकाल किमान १५ ते २० दिवसांत लागावा, यादृष्टीने विद्यापीठाने सर्व संलग्नित उच्च महाविद्यालयांच्या प्राचार्यांना निर्देश दिले आहेत.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाशी जिल्ह्यातील १०९ संलग्नित उच्च महाविद्यालये आहेत. त्याअंतर्गत ७० हजार विद्यार्थी प्रवेशित असून त्यांची २०२४-२५ या शैक्षणिक वर्षातील पहिली सत्र परीक्षा डिसेंबरच्या दुसऱ्या आठवड्यात सुरू होणार आहे. सुरवातीला पारंपारिक अभ्यासक्रमांची परीक्षा सुरू होईल आणि डिसेंबरअखेर अभियांत्रिकीची परीक्षा सुरू होणार आहे. विद्यापीठाने कॉपीमुक्त परीक्षेसाठी यंदा द्वितीय व अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांसाठी (प्रथम वर्ष सोडून सर्वच वर्षांतील विद्यार्थ्यांसाठी) सरमिसळ पद्धत अवलंबण्याचा निर्णय घेतला आहे. तर प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांची परीक्षा त्यांच्याच महाविद्यालयात पार पडणार आहे.

दरम्यान, सरमिसळ पद्धतीत एकामागे एक बसलेला विद्यार्थी वेगवेगळ्या अभ्यासक्रमांचा असणार आहे. तशी बैठक व्यवस्था विद्यापीठाकडून केली जाणार आहे. याशिवाय परीक्षा केंद्रांना भरारी पथकांच्या भेटी देखील असणार आहेत. (पान 2 वर..)






## संपादकीय

# सत्तेचे अर्थकारण

लोकशाहीत जनादेशाला फार महत्त्व असते. अलीकडच्या काळात मतदारांनी ठोस जनादेश देत निर्णायक भूमिका घेतली आहे. विशेषतः 2021 नंतर यात आणखी मोठा बदल झाला आहे. राज्यांमध्ये किंवा केंद्रांमध्ये जे सत्तेवर येत आहेत त्यांना देशातील निम्मी लोकसंख्या असलेल्या महिला वगार्चे भक्कम पाठबळ मिळाल्याचे दिसते आहे. त्यामुळे महिला मतदारच आता राजकीय पक्षांच्या केंद्रस्थानी आल्या आहेत. निवडणुकीचे राजकारण हे शेवटी मतांची बेगमीच असते. महिला एकहाती निवडणुकीचे चित्र बदलू शकतात याची खात्री झाल्यानंतर महिला मतदारांना खूश करण्याचे प्रयत्न सुरू झाले. यातून सुरू झालेली स्पर्धा आता शिगेला पोहोचली आहे. मात्र, राज्ये त्यातून निर्माण होणारे आर्थिक आव्हान कितपत पेलू शकतील हे पाहणेही महत्त्वाचे ठरणार आहे. सध्याच्या घडामोडी पाहता एकच म्हणावे लागते की, चांगले राजकारण हे नेहमी वाईट अर्थकारणाची पायाभरणी करत असते.

महाराष्ट्र आणि झारखंड या दोन राज्यांतील विधानसभा निवडणुकांमध्ये वेगवेगळ्या आघाड्यांचा विजय झाला. तरी त्यांच्या विजयात मात्र एक समान सूत्र आहे. या दोन्ही राज्यांमध्ये निवडणुकांच्या अगदी काही महिने अगोदर सुरू केलेल्या थेट लाभ देणाऱ्या योजना व विशेषतः महिलांच्या लाभाच्या योजना हे ते सूत्र.

महाराष्ट्रात लाडक्या बहिणींनी चमत्कार घडवला. जेमतेम 100 ते 125 दिवसांपूर्वी झालेल्या लोकसभा निवडणुकीत ज्या महायुतीला मतदारांनी डबल इंजिनचे आमिष असूनही नाकारले होते, त्याच महायुतीला लाडक्या बहिणींनी केवळ चारच महिन्यांत अविश्वसनीय बहुमत प्रदान केले. झारखंडमध्येही हेमंत सोरेन सरकारने निवडणुकीच्या तोंडावरच 'मैय्या सन्मान' योजना सुरू केली. महिलांना दरमहा 1 हजार रुपये देणाऱ्या या योजनेने सोरेन यांना भ्रष्टाचाराच्या आरोपाखाली झालेला तुरूंगवास हा त्यांच्यावर अन्याय होता असे मानावे लागेल. इतपत सोरेन यांच्यावर विश्वास ठेवत त्यांची सत्तावापसी केली. महायुतीने आता लाडक्या बहिणींना 1500 ऐवजी 2100 रुपये देण्याची घोषणा केली आहे. तर झारखंडमध्येही 'मैय्या सन्मान' योजनेची रक्कम 1 हजारवरून 2500 पर्यंत नेली जाणार आहे. याचा सरळ अर्थ असा आहे की या योजनांच्या अंमलबजावणीत राज्यांच्या तिजोरीवर मोठा ताण पडणार आहे. निवडणुकीच्या वेळी मतदारांना आमिष दाखवण्याचा पायंडा खूप जुना आहे. जी आश्वासने पूर्ण करता आली नाही किंवा होऊ शकली नाही त्यांची प्रिंटिंग मिस्टेक अथवा जुमला अशी सांभावना खुद्द आश्वासन देणाऱ्यांनीच केली होती, हा इतिहास सगळ्यांना ज्ञात आहे. तथापि, आता प्रत्यक्ष रोख रक्कमच खात्यांमध्ये जमा केली जाते आहे. पश्चिम बंगाल, मध्य प्रदेश, कर्नाटक, तेलंगणा, हरियाणा आणि आता महाराष्ट्र व झारखंड या दोन राज्यांत महिलांना दिला जाणारा थेट लाभ आणि त्यामुळे महिलांनी दिलेला निर्णायक कौल यामुळेच लोकप्रियता ओहोटीला लागलेली सरकारे तगली आहेत. हाच अलीकडच्या धक्कादायक निकालांचा सार.

या सर्व राज्यांमध्ये सरकारविरोधी नाराजीची पाटी पूर्ण पुसून कोरी केली गेली. जेव्हा एखादे सरकार सलग सत्तेवर असते तेव्हा त्याला मतदारांच्या नाराजीचा या सर्व राज्यांमध्ये सरकारविरोधी नाराजीची पाटी पूर्ण पुसून कोरी केली गेली. जेव्हा एखादे सरकार सलग सत्तेवर असते तेव्हा त्याला मतदारांच्या नाराजीचा सामना करावाच लागतो. या नाराजीवर लक्ष्मी भंडार योजनेमुळे बंगालच्या ममता बॅनर्जी यांना मात करता आली. मध्य प्रदेशात भाजपच्या सरकारच्या दोन दशकांच्या राजवटीविरोधात नाराजीची लाटच होती. 'लाडली बहना' योजनेने ती लाट तर संपवलीच, पण योजना बंद होणार नाही किंवा करता येणार नाही एवढे भक्कम संख्याबळ भाजपला दिले. कर्नाटकात काँग्रेसची 'गृहलक्ष्मी योजना', तेलंगणात 'महालक्ष्मी योजना' झाली आणि येथील गृहलक्ष्मींनी दोन्ही राज्यांतील सत्ता काँग्रेसला बहाल केली. शेतकरी, ज्येष्ठ नागरिकांसाठी सुरू केलेल्या अन्य योजना सत्ताधाऱ्यांसाठी बोनस मिळवून देणाऱ्या ठरल्या. निवडणूक आयोगाने दिलेल्या आकडेवारीनुसार, महाराष्ट्रात 2019 च्या निवडणुकीच्या तुलनेत यंदाच्या निवडणुकीत महिलांचे मतदान 52,58,671 एवढे वाढले. झारखंडमध्ये 81 विधानसभा मतदारसंघांपैकी 68 मतदारसंघांमध्ये महिलांचे मतदानाचे प्रमाण हे पुरुषांपेक्षा जास्त आहे. आणखी एक आकडेवारी असे सांगते की, महाराष्ट्रात आता लाडक्या बहिणींना दिली जाणारी रक्कम 2100 रुपये करण्यात आली, तर त्याकरता राज्याला अतिरिक्त निधी उभारावा लागेल.

दरमहा साधारण पाच हजार कोटी रुपयांचा हा खर्च आहे. सरकारने 46 हजार कोटी रुपयांची तरतूद केल्याचे सांगण्यात आले. हे पैसेही कर्जाद्वारे उभे केले गेले आहेत. राज्यावर अगोदरच 9 लाख कोटी रुपयांचे कर्ज आहे. लाडके भाऊ आणि अन्य योजनांसाठी वर्षाला अतिरिक्त 60 हजार कोटी रुपयांचा बोजा पडणार आहे. जे महाराष्ट्रात होणार तेच अन्य राज्यांतही होणार आहे. मध्य प्रदेशपुरते बोलायचे झाले, तर या राज्याने वर्षभरातच 49 हजार कोटी रुपयांचे कर्ज काढले आहे. इतर राज्यांवरही बोजा पडत असल्याच्या बातम्या रोजच येत आहेत. लाभार्थींना थेट रोख रक्कम दिल्यामुळे त्यांच्या मूलभूत गरजा भागवता येण्यास मदत होते, असे सांगत काही जागतिक संस्थांनी भारतात सुरू असलेल्या या योजनांची प्रशंसाही केली होती. मात्र त्यांनी जेव्हा प्रशंसा केली होती त्यावेळी एकटे केंद्र सरकार थेट आर्थिक मदत देत होते. आता प्रत्येक राज्यात सरकार टिकवण्याचे हुकुमी साधन म्हणून थेट लाभाच्या योजना सुरू केल्या जात असल्यामुळे आर्थिक गणित बिघडणारच नाही तर कोलमडणारही आहे. अर्थात, चांगल्या राजकारणासाठी म्हणून जे काही सुरू केले जाते ते अंततः अर्थकारणाच्या मुळावरच उठणारे असते.

# जिल्ह्यातील 11 विधानसभा मतदारसंघात जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या नियंत्रणाखाली निवडणुका यशस्वी



"भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार महाराष्ट्र विधानसभा सार्वजनिक निवडणूक 2024 चा कार्यक्रम दिनांक 15 ऑक्टोबर 2024 रोजी जाहीर झाला. त्यानुसार संपूर्ण राज्यासह सोलापूर जिल्ह्यातील अकरा विधानसभा मतदारसंघात दिनांक 20 नोव्हेंबर 2024 रोजी मतदान झाले तर दिनांक 23 नोव्हेंबर 2024 रोजी मतमोजणीची प्रक्रिया पार पडली. दिनांक 15 ऑक्टोबर ते 23 नोव्हेंबर 2024 या कालावधीत संपूर्ण निवडणूक प्रक्रिया जिल्ह्यात अत्यंत निर्भीड व शांततामय वातावरणात पार पडली. जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या कुशल नेतृत्वाखाली सर्व 11 विधानसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी, जिल्हास्तरीय नोडल अधिकारी, उपजिल्हा निवडणूक अधिकारी, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी यांनी ही प्रक्रिया यशस्वी करण्यात मोलाची भूमिका बजावली, ही संपूर्ण प्रक्रिया पार पाडण्यात जवळपास 18 हजार अधिकारी कर्मचारी यांनी आपले योगदान देऊन लोकशाहीचा हा उत्सव थाटात पार पाडला."

निवडणूक आयोगाने अधिसूचना जाहीर केल्यानंतर जिल्हा प्रशासनाने 24 तास, 48 तास व 72 तासात जिल्ह्याच्या शहरी व ग्रामीण भागातील सर्व राजकीय होर्डिंग पोस्टर बॅनर्स हाटवले. तसेच निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार यांनी आदर्श आचारसंहिता कक्ष प्रमुख म्हणून संपूर्ण जिल्ह्यात आदर्श आचारसंहितेची काटेकोर अंमलबजावणीबाबत जिल्हाधिकारी आशीर्वाद यांच्या मार्गदर्शनाखाली चांगले काम केले. जिल्हास्तरीय सर्व नोडल अधिकारी तसेच निवडणूक निर्णय अधिकारी व त्यांच्या अधिनस्त सर्व अधिकारी कर्मचारी यांचे प्रशिक्षण अत्यंत चांगले देण्यात आले, यासाठी उपजिल्हाधिकारी संतोषकुमार देशमुख यांनी विशेष प्रयत्न केले. जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व निवडणूक यंत्रणा अत्यंत दक्ष राहून कामकाज करत होते. मतदार जनजागृती करण्यासाठी स्वीप अंतर्गत संपूर्ण जिल्हाभरात अत्यंत मोठ्या प्रमाणावर कार्यक्रम घेण्यात आले यासाठी स्वीप नोडल अधिकारी अतिरिक्त जिल्हाधिकारी मोनिका सिंह ठाकुर व जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक सुधीर ठोंबरे यांनी उत्कृष्ट नियोजन करून ज्या ठिकाणी लोकसभा निवडणुकांमध्ये कमी मतदान झालेले आहे अशा ठिकाणीही मतदार जागृती मोहीम राबवली. शालेय तसेच महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना जनजागृती मोहिमेत सहभागी करून घेण्यात आले. संपूर्ण जिल्हाभरात अत्यंत चोखपणे मतदार जनजागृतीचा कार्यक्रम घेण्यात आल्यामुळे सन 2019 च्या विधानसभा निवडणुकांमध्ये 64.59 टक्के मतदान झालेले होते तर यावर्षी 20 नोव्हेंबर 2024 रोजी जिल्ह्यात 67.72% मतदान झाले मतदानाच्या एकूण टक्केवारी जवळपास तीन टक्के वाढलेली दिसून आली. विधानसभेला लोकसभा निवडणूक 2024 पेक्षा अधिक मतदान केंद्र ची संख्या झाली. विधानसभेला एकूण 11 विधानसभा मतदारसंघात 3738 मतदान केंद्रे होती. या सर्व मतदान केंद्रावर निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार किमान पायाभूत सोयीसुविधाचे निर्मिती केलेली होती. मतदाराला मतदान केंद्रावर येऊन सहज मतदान करता येईल या पद्धतीने मतदान केंद्राची निवड करण्यात आलेली होती तसेच प्रत्येक मतदान केंद्रावर मतदारांना कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही यासाठी आवश्यक सर्व सोयी सुविधा उपलब्ध करून दिलेल्या होत्या. एकूण मतदान केंद्राच्या जवळपास 60 टक्के म्हणजेच 2305 मतदान केंद्रावर वेब कास्टिंग ची सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली होती. या सुविधेमुळे संबंधित मतदान केंद्रावर कशा पद्धतीने मतदान केंद्राध्यक्ष व केंद्र अधिकारी मतदानाची प्रक्रिया राबवत आहेत याची माहिती जिल्हा नियंत्रण कक्षात जिल्हाधिकारी स्वतः पहात होते व आवश्यक त्या ठिकाणी निर्देश देत होते.

सी-व्हिजील कक्षात निवडणुकीच्या अनुषंगाने आलेल्या तक्रारीवर कक्षाच्या वतीने वेळेत तक्रारी संबंधितांपर्यंत पोहोचवून त्याचा निपटारा करण्यात आला. या कक्षाचे नोडल अधिकारी आशिष लोकरे यासाठी सातत्याने लक्ष ठेवून होते. तसेच विधानसभा स्तरावरील सर्व निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडून जिल्हा निवडणूक अधिकारी यांच्याकडे होणारे रिपोर्टिंग मुख्य निवडणूक अधिकारी महाराष्ट्र राज्य यांना कळविण्यासाठी महसूल उपजिल्हाधिकारी अमृत नाटेकर यांनी अत्यंत जबाबदारपूर्वक काम केले. तसेच जिल्हास्तरावर सर्व यंत्रणांनी विधानसभा स्तरावरील निवडणूक निर्णय अधिकारी व त्यांच्या अधिनस्त यंत्रणांना पूरक कामकाज करून ह्या निवडणुका यशस्वीपणे पार पाडण्यात सहकार्य केले. प्रत्येक यंत्रणेला दिलेली जबाबदारी अत्यंत काटेकोरपणे पार पाडून हा लोकशाहीचा उत्सव मोठ्या थाटात साजरा होण्यास प्रत्येकाने आपल्या परीने वाटा उचलला.

### प्राथमिक आरोग्य आणि भोजनाची सुविधाः-

मतमोजणी परिसरात एखादी आरोग्याची समस्या उद्भवली तर त्यावेळेस त्याच्यावर ताबडतोब प्राथमिक उपचार करण्याकरता प्राथमिक उपचार किट तसेच ॲम्बुलन्सची व्यवस्था मतमोजणी परिसरात करण्यात आली होती. परिसरात चहा, अल्पोहार आणि भोजन व्यवस्था ठेवण्यात आली होती. त्यामुळे कुठलाही प्रकारचा तणाव हा कर्मचारी अधिकारी आणि निवडणूक उमेदवार आणि त्यांच्या प्रतिनिधींवर आला नाही. या संपूर्ण मतमोजणी प्रक्रियेसाठी बंदोबस्तासाठी आलेल्या पोलिसांना ही आरोग्य व चहापाणी जेवणाची व्यवस्था करण्यात आलेली होती. सोलापूर मनपाच्या स्वच्छता विभागाकडून सातत्याने परिसराची स्वच्छता करण्यात येत होते.

### पोलीस सुरक्षा व्यवस्था :

मतमोजणी ही शांततेत व सुरळीत पार पडावी व कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी संपूर्ण सुरक्षा व्यवस्था, आग प्रतिबंधक सुविधा यंत्रणा सज्ज ठेवण्यात आल्या होत्या. प्रत्येक मतमोजणी कक्षात, पुरेसा वीज पुरवठा व जनरेटर बॅकअप सुविधा देण्यात आली होती. मतमोजणी कक्ष आणि परिसरात चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आले होते. चोख सुरक्षा व्यवस्थेमध्ये मतमोजणी निर्विघ्नपणे पार पडले.

### मतमोजणी केंद्रावर राखीव कर्मचाऱ्यांची नियुक्ती :

मतमोजणी कामाकरिता राखीव अधिकारी आणि कर्मचार्यांची व्यवस्था करण्यात आली होती. तसेच स्ट्रांग रूममधून मतमोजणी कक्षामध्ये मतदान यंत्र पोहोचविण्यासाठी कलर कोडींग केलेले कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली होती. अतिशय शिस्तबद्ध पद्धतीने मतदान यंत्र नेण्यात येत होते.

### जिल्हा व विधानसभा निहाय माध्यम कक्षाची स्थापनाः

मतदानाच्या दिवशी जिल्हास्तरीय माध्यम कक्ष जिल्हा नियोजन भवन येथून सुरू होते तर प्रत्यक्ष मतमोजणी दिवशी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या व्हीआयपी सभागृह येथून जिल्हास्तरीय माध्यम कक्षाचे कामकाज सुरू होते. अकरा विधानसभाच्या माध्यम कक्षाच्या नोडल अधिकारी यांच्याकडून माहिती घेऊन पत्रकारांना देण्यात येत होती. त्याप्रमाणेच विधानसभा स्तरावर पत्रकारांसाठी देखील अकरा मतमोजणी केंद्रावर पत्रकार कक्ष उभे करण्यात येऊन एका नोडल अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात आली होती. या कक्षामध्ये चहा, शुद्ध पाणी आणि भोजनाची व्यवस्था ठेवण्यात आली होती. या पत्रकार कक्षामध्ये दूरचित्रवाणी, इंटरनेट सुविधा, झेरॉक्स, संगणक, प्रिंटर अशा सर्व सुविधा पत्रकारांना पुरवण्यात आल्या. तसेच सर्व संबंधित मतदार संघातील फेरी निहाय येणारी आकडेवारी व्हाट्सअप ग्रुपवर पाठविण्याबरोबरच त्याची फेरी निहाय प्रत्यक्ष प्रत पत्रकारांना देण्यात येत होती.त्यामुळे पत्रकारांना अचूक आणि वेळेवर वार्तांकन करण्यासाठी मदत झाली. अशा उत्कृष्ट सुविधामुळे संपूर्ण मतमोजणी प्रक्रिया उत्तमरित्या संपन्न झाली. याबाबत पत्रकारांनी कर्मचाऱ्यांनी आणि उमेदवाराच्या प्रतिनिधी देखील समाधान व्यक्त केले. सेवा सुविधा अधिक पुरवल्या की प्रत्येकाला काम करण्याची ऊर्जा मिळते. या हेतूने जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या संकल्पनेतून या दजेर्दार सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या.

जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी प्रत्येक निवडणूक निर्णय अधिकारी यांना मतमोजणी दिवशी नियुक्त करण्यात आलेले अधिकारी कर्मचारी यांना चांगल्या सुविधा देण्याबाबत वेळोवेळी मार्गदर्शन करण्यात आले होते. तसेच त्या सुविधा व्यवस्थितपणे दिल्या जात आहेत का नाही याची खात्री केली जात होती. त्यामुळे 23 नोव्हेंबर 2024 रोजी सकाळी आठ वाजता सर्व 11 विधानसभा मतदारसंघात मतमोजणी प्रक्रियेला सुरुवात झाली प्रथम पोस्टल मताची मोजणी करण्यात आली त्यानंतर ईव्हीएम मशीन मधील मतांची मोजणी करून फेरीनिहाय निकाल जाहीर करण्यात येत होते. जाहीर झालेल्या निकालाची प्रत तात्काळ माध्यम कक्षा देण्यात येत होती. जवळपास सर्व विधानसभा मतदारसंघात मतमोजणी प्रक्रिया वेळेत पूर्ण होऊन विजयी उमेदवारांना निवडणूक निर्णय अधिकारी यांनी निवडणूक निरीक्षक यांच्या उपस्थितीत प्रमाणपत्र दिले. लोकसभा निवडणूक 2024 प्रमाणेच जिल्हा निवडणूक अधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या मार्गदर्शन व नियंत्रणाखाली विधानसभा सार्वत्रिक निवडणूक 2024 अंतर्गत मतदान व मतमोजणी सह सर्व निवडणूक प्रक्रिया सुरळीत आणि शांततेत पार पाडल्यामुळे जिल्हा प्रशासनाचे सर्व स्तरावरून कौतुक होत आहे.

**सुनील सोनटक्के**
जिल्हा माहिती अधिकारी सोलापूर

## प्रबोधन

# खरे शिक्षण ते । विवेक जागवी

पाश्चात्त्य विचारवंत एच. मान यांनी केलेली शिक्षणाची एक व्याख्या चिंतनप्रेरक कमी; पण चिंताप्रेरक अधिक आहे. ते म्हणतात, 'कोणत्याही माणसाला योग्य ते शिक्षण घेतल्यानंतरच मानव म्हणता येईल. शिक्षणाशिवाय मनुष्य म्हणजे केवळ प्राणी!' त्यामुळेच जगाच्या सातशे कोटी मनुष्यांपैकी तीनशे कोटी माणसं तरी मनुष्य म्हणण्यालायक असतील काय, ही चिंता कोणाही सुबुद्ध व्यक्तीला लागणं केवळ शक्यच नव्हे, तर आवश्यकही आहे. आज जगभर शिक्षणाचा प्रचार बऱ्यापैकी झालेला आहे. प्रत्येक देश शिक्षणाला महत्त्व देतो आहे. अगदी दुर्गम प्रदेशातील आदिवासी अतिदारिद्र्यपीडित लोक, भटक्या जमाती यांचा अपवाद वगळता बहुतेक लोक प्राथमिक- माध्यमिक शिक्षण तरी घेतच आहेत. तरीही जगात माणसं कमीच आहेत, असं नाइलाजाने म्हणावं लागेल.

स्वामी विवेकानंदांचा एक विचार वरील विचाराचा छानपैकी विस्तार करणारा आहे. जगभराच्या समाजस्थितीचं निरीक्षण केल्यानंतर स्वामीजी म्हणतात, 'कुणी काही परीक्षा दिल्या वा व्याख्यानांची आतषबाजी केली की, झाला तो तुमच्या दृष्टीने शिक्षित! जे शिक्षण लाभल्याने सामान्य जनता जीवनसंग्रामाला लायक होऊ शकत नाही, जे शिक्षण चरित्रबल, परसेवा तत्परता व सिंहासारखं साहस निर्माण करू शकत नाही, त्याला काय शिक्षण म्हणायचं? ज्या शिक्षणाने माणूस जीवनात आपल्या पायांवर उभा राहू शकतो ते खरं शिक्षण.' जे शिक्षण आज शाळा-कॉलेजमधून दिलं जातं, त्यामुळे स्वामी विवेकानंदांच्या मते अजीर्णाच्या रोग्यांची जातच जणू तयार होत आहे. ते म्हणतात, 'किल्ली दिलेल्या एखाद्या यंत्रासारखं तुम्ही राबता. जन्माला आले आणि मरून गेले, या विधानाचं तुम्ही जणू मूर्तिमंत उदाहरणच आहात. '

महात्मा गांधी हे थोर शिक्षणतत्त्वज्ञ होते. आपल्या देशाची विषमतामूलक समाजस्थिती पाहून त्यांनी मूलोद्योगी शिक्षणाची (Basic Education System) गरज मोठ्या कळवळ्याने सांगितली. 'शिक्षित व्यक्तीला उद्योगीपणाचं वळण लागलं, तर तो उपाशी राहाणार नाही. परावलंबी होणार नाही आणि दैववादी, भाग्यवादी, नियतीवादी, नशीबवादी होणार नाही,' असं गांधीजींना वाटत होतं. भारतीय मनोवृत्तीचं त्यांचं आकलन आगरकरांसारखंच होतं. आगरकरांनी म्हटलं आहे की, 'आम्हा लोकांची प्रवृत्तीच अशी आहे की, ज्यावेळी आमच्या अंगणात तोफा डागाव्यात, त्यावेळी बाहेर काय चाललंय याचा आपण विचार करतो. स्वतःच्या पोटात भुकेची आग उठेपर्यंत, कधी आमच्या समाजधुरिणांनी बेकारीच्या समस्येचा गंभीरपणे विचार केला नाही आणि आता मात्र गळ्याशी आल्यावर उपाशी लेखक बेकारीचं स्वरूप समजून न घेता रकानेच्या रकाने खरडू लागलेत.' महात्माजींना अकर्मण्यतेची चीड होती. 'मूलोद्योगी शिक्षण' हाच त्यावर एकमेव उपाय होता आणि आजसुद्धा त्यांचा विचार कालबाह्य झालेला नाही.

महात्माजींच्या याच विचारावर राष्ट्रसंत तुकडोजींनी आपले विचार जीवनशिक्षण म्हणून मांडले. शिक्षणासाठी जीवन नव्हे, तर जीवनासाठी शिक्षण, हे शिक्षणाचं उद्दिष्ट व्यक्त करताना ते लिहितात, शिक्षणातची जीवनाचे काम। दोन्हींची सांगड व्हावी उत्तम । चिंता नसावी भोजनासाठी दाम । मागण्याची भीक जैसी ॥ शिक्षणातून उदरनिर्वाहाची व्यवस्था व्हावी, हा त्यांचा आग्रह लाखमोलाचा आहे. अर्थात, मुलात एखादा तरी असावा गुण। ज्याने पोट भरेल त्यात निपुण । नये संसारामाजी अडचण । कोणत्याही परी॥ म्हणजे जीवनाच्या गरजा संपूर्ण । निर्वाहाचे एकेक साधन। संबंधित विषयाचे समग्र ज्ञान। यांचा अंतर्भाव शिक्षणी ॥

राष्ट्रसंत तुकडोजी त्याही पुढे जाऊन, आत्मसंरक्षण, अन्यायपरिमार्जन, दुबळ्यांचं रक्षण, गुंडाचा सशस्त्र प्रतिकार, यासाठी समर्थ, बलिष्ठ, निर्भय, साहसपूर्ण वीरवृत्ती जोपासणाऱ्या शिक्षणाचाही आग्रह करतात. गावावर आली गुंडांची धाड । विद्यार्थी दारे लाविती धडाधड । वाडवडिलांच्या अब्रूची धिंड। काय शिक्षण कामाचे?। म्हणोनि पाहिजेत बलवान मुले। कुस्ती, मल्लखांब खेळणारे भले। धडाडीने प्रतीकारार्थ धजले। तरीच शिक्षण उपयोगी ॥

आज अभ्यासक्रमात समाजोपयोगी विषयांचा अभाव दिसून येतो. ग्रामविकास, सहकार, पाककला, कृषिजीवन, समाजसेवा, व्यसनमुक्ती, दारिद्र्यमुक्ती, मैत्रीशास्त्र, लैंगिकशास्त्र, कला, स्वाद, निसर्गोपचार, योगशास्त्र असे कितीतरी जीवनोपयोगी विषय विद्यार्थ्यांच्या अभ्यासात समाविष्ट करणं अत्यावश्यक आहे. वसतिगृहयुक्त शिक्षणाचा विचार आपल्या देशाने अद्यापि स्वीकारलेला नाही. छत्रपती शाहूंनी वसतिगृहाची मोहीम राबवली नसती, तर महात्मा फुले यांच्या कायार्चा आज जो प्रचार दिसतो, तितका झाला नसता. तुकडोजीसुद्धा वसतिगृहयुक्त शिक्षणाचे समर्थकच आहेत. ते सूचना करतात, जन्म देण्याचे काम मातापित्यांचे । शिक्षणाचे काम विद्यागुरूचे । तेथे आसक्तीने पुत्रधन देशाचे। बिघडवू नये लाडावोनी। आदर्श शिक्षणपद्धतीने आदर्श देशनिर्मिती, आदर्श मानवनिर्मिती होईल, हेच खरे ! कारण-

खरे शिक्षण ते । विवेक जागवी
करी बुद्धिजीवी । माणसाला ॥१
सद्भाव जागवी । ते खरे शिक्षण
पशुत्वापासून । दूर ठेवी ॥२
जगणे सुलभ व्हावे शिकल्याने
जोडावीत मने । समाजाची ॥३
हिंसा, क्रौर्य, घात । यांना ठेवी दूर
प्रेमा आणि पूर। तीच विद्या ॥४
सेवाभावनेला । सर्वोच्च मानते
शिक्षण असे ते । सर्वोच्च की ॥५
अपूर्ण माणसा । करितसे पूर्ण
शिक्षण ते धन्य । सर्वकाळी ॥६
दारिद्य, शोषण । गुलामीनाशक
हवे संजीवक । ज्ञान आता ॥७
अशा शिक्षणाने । जिणे धन्य व्हावे
समाजाला व्हावे । हितकारी ॥८



**प्रा. डॉ. जे. बी. शिंदे**
844/1, साळोखेनगर,
कळंबा रोड, कोल्हापूर-416012
92258 09071

पान १ वरून

## निवडणुकीत पैशांचा धुमाकूळ...

'आताशी सुरुवात झाली आहे. एवढ्याशा आंदोलनाने काय होणार असं कोणाला वाटत असेल, तर वणवा पेटवायला एक ठिणकी कारणीभूत असते आणि ती ठिणगी आज पडलेली आहे. पैशांचा अमाप वापर झाला हे आपल्याही कानावर आलं. सर्वांनी विनोद तावडेंचा तो व्हिडिओही बघितला. योजनांचा पडणारा पाऊस पाहिला. थोडक्यात या सरकारने काय केलं आहे, की योजनांचा ॲनेस्थेशिया देऊन आपलं सत्तेचं ऑपरेशन पूर्ण केलं.'

'महत्तावाचा मुद्दा एक नाहीये, असे अनेक मुद्दे आहेत. त्यापैकी एक ईव्हीएमचा मुद्दा आहे आणि म्हणूनच मी उल्लेख केला, की जिंकलेले सुद्धा हारल्यासारखे येतात आणि हारलेले सुद्धा जिंकल्यासारखे येतात. याला एक कारण नक्कीच ईव्हीएम आहे', अशा म्हणत उद्धव ठाकरेंनी एश्ट घोटाळा मुद्दावर भाष्य केलं.

'आपण फ्ळकच्या माध्यमातून इतर कोणतीही माहिती मागवू शकतो. अगदी सुरुवातीला एक-दोन वेळा मी बॅलेट पेपरवर मतदान केलं आहे. लोकशाहीमध्ये माझं मत कुठे जातं हे मला शेवटपर्यंत कळण्याचा अधिकार तुम्ही आज माझा काढून घेतला आहे. कोणी म्हणतं तुम्हाला तिकडे ती रिसीट दिसत नाही का? रिसीट दिसते बरोबर आहे, पण ती रिसीट दिसल्यानंतर पुन्हा फेर मतमोजणीची मागणी करतो तेव्हा ती मोजली का जात नाही? व्हीव्हीपॅटवर जी निशाणी आहे किंवा ज्या रिसीट येतात त्यासुद्धी तुम्ही मोजा, कारण माझं मी मत जे देतो ते तुम्ही मला तिकडे दाखवता, पण आतमध्ये रजिस्टर्ड कसं होतंय, ते कळत नाही, ते कळायला मला मार्ग नाही', असा सवाल उद्धव ठाकरेंनी केला.

## परीक्षा...

परीक्षा झाल्यावर व्यावसायिक अभ्यासक्रमांचे पेपर 'ऑनस्क्रिन' पद्धतीने तपासले जातील. प्राध्यापक त्यांच्या लॉगिनवर घरबसल्या पेपर तपासतील. तर, पारंपारिक अभ्यासक्रमांचे पेपर बार्शीतील शिवाजी महाविद्यालय, सोलापुरातील दयानंद महाविद्यालयात तर पंढरपुरातील उमा महाविद्यालयात तपासले जाणार आहेत. पेपर जसजसे होतील, तशा उत्तरपत्रिकांची तपासणी हाती घेऊन निकाल वेळेत लावले जाणार आहेत.

विधानसभा निवडणुकीमुळे नियोजित परीक्षा पुढे ढकलण्यात आली असून आता १० नोव्हेंबरपासून परीक्षेला सुरवात होईल. पेपर झाल्यानंतर लगेचच त्या त्या प्रश्नपत्रिकांची तपासणी पूर्ण केली जाणार आहे. साधारणतः १५ ते २० दिवसांत निकाल लागतील, यादृष्टीने नियोजन करण्यात आले आहे. - **डॉ. श्रीकांत अंधारे,** परीक्षा नियंत्रक, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ

## वात्रटिका

### ताण ओढाताण

निवडून येऊनही त्यांच्या
मागे गृह पिडा आहे...
कोण होणार मुख्यमंत्री
हा न सुटलेला तिढा आहे...
जुळलेली मैत्री खुर्चीसाठी
धुसफूस करू लागली...
दोघात तिसरा आला आणि
त्याचीच मुसमुस सुरू झाली...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
8698067566

# अन्नधान्य, कडधान्य व गळित धान्य पिकांसाठी राज्यांतर्गत पीक स्पर्धेचे आयोजन

सोलापूर, (कटूसत्य वृत्त):- राज्यात पिकांची उत्पादकता वाढविण्यासाठी विविध भागांमध्ये शेतकऱ्यांकडून विविध प्रयोग होऊन उत्पादकतेत वाढ करण्यात येते. अशा प्रयोगशील शेतकऱ्यांना मिळालेल्या उत्पादकतेबाबत प्रोत्साहन देऊन गौरव केल्यास त्यांचे मनोबल वाढून आणखी उमेदीने नवनवीन, अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर केला जाईल. यामुळे कृषी उत्पादनामध्ये भर घालण्यासाठी शेतकऱ्यांचे योगदान मिळेल. तसेच त्यांचे मार्गदर्शन परिसरातील इतर शेतकऱ्यांना होऊन राज्याच्या एकूण उत्पादनात मोलाची भर पडेल, हा उद्देश ठेवून राज्यांतर्गत पीकस्पर्धा योजना राबविण्यात येत आहे. रब्बी हंगाम सन 2024 पीक स्पर्धेसाठी जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी सहभाग घ्यावा, असे आवाहन कृषी आयुक्तालयाचे कृषी संचालक (विस्तार व प्रशिक्षण) रफिक नाईकवाडी यांनी केले आहे.

कृषी विभागामार्फत रब्बी हंगाम सन 2024 मध्ये सर्वसाधारण व आदिवासी गटासाठी ज्वारी, गहू, हरभरा, करडई व जवस या 5 पिकांसाठी पीक स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. पीकस्पर्धेसाठी ज्वारी, गहू, हरभरा, करडई व जवस या पिकांसाठी अर्ज दाखल करण्याची अंतिम तारीख 31 डिसेंबर 2024 आहे. स्पर्धेसाठी प्रवेश शुल्क प्रत्येक पिकासाठी स्वतंत्र सर्वसाधारण गटासाठी रक्कम रु.300 व आदिवासी गटासाठी रक्कम रु. 150 राहील. स्पर्धेत भाग घेण्यासाठी शेतकऱ्याकडे स्वतःच्या नावावर जमीन असणे व ती जमीन तो स्वतः कसत असणे आवश्यक आहे. स्पर्धेत भाग घेणाऱ्या शेतकऱ्याला एकाच वेळी एकापेक्षा जास्त पिकांसाठी स्पर्धेत सहभाग घेता येईल. तसेच पीक स्पर्धेमध्ये सहभाग घेण्याकरता स्पर्धकास शेतावर त्या पिकाखाली किमान 40 आर क्षेत्रावर सलग लागवड असणे आवश्यक आहे.

पीक स्पर्धेमध्ये सहभाग घेण्याकरता स्पर्धकांनी विहित नमुन्यातील अर्ज (प्रपत्र-अ), ठरवून दिलेले प्रवेश शुल्क भरल्याचे चलन, 7/12, 8-अ चा उतारा, जात प्रमाणपत्र (केवळ आदिवासी असल्यास), पीक स्पर्धेसाठी शेतकऱ्याने संबंधित 7/12 वरील घोषित केलेल्या क्षेत्राचा चिन्हांकित केलेला नकाशा, बँक खाते चेक/पासबुकच्या पहिल्या पानाची छायांकित प्रत आदी कागदपत्रे अजासीबत जोडावीत.

सर्वसाधारण व आदिवासी गटातील शेतकऱ्यांसाठी पीक निहाय राज्य पातळी प्रथम क्रमांक 50000 रुपये, द्वितीय क्रमांक 40000 रुपये, तृतीय क्रमांक 30000, जिल्हा पातळीवर प्रथम क्रमांक 10000 रुपये, द्वितीय क्रमांक 7000 रुपये, तृतीय क्रमांक 5000, व तालुका पातळीवरील प्रथम क्रमांक 5000 रुपये, द्वितीय क्रमांक 3000 रुपये, तृतीय क्रमांक 2000 रुपये असे बक्षिसाचे स्वरुप राहील.

या योजनेबाबत अधिक माहितीसाठी शेतकऱ्यांनी तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा, अथवा महाराष्ट्र शासन कृषी विभागाचे संकेतस्थळ www. krishi.maharashtra.gov.in ला भेट द्यावी. असे आवाहनही कृषी संचालक (विस्तार व प्रशिक्षण) नाईकवाडी यांनी केले आहे.

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स (0217)2605091 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone-0217-2605091 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# सहकार महर्षि कारखान्याच्या १ लाख ११ हजार १११ व्या साखर पोत्याचे पूजन



**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** शंकरनगर अकलूज येथील सहकार महर्षि शंकरराव मोहिते-पाटील सहकारी साखर कारखान्याच्या सन २०२४-२५ च्या गळीत हंगामामध्ये उत्पादित झालेल्या १ लाख १ हजार १११ व्या साखर पोत्याचे पूजन कारखान्याचे चेअरमन जयसिंह शंकरराव मोहिते-पाटील यांचे शुभहस्ते संपन्न झाले.

कारखान्याचे मार्गदर्शक संचालक व महाराष्ट्र राज्याचे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह शंकरराव मोहिते-पाटील यांचे कुशल मार्गदर्शनाखाली व चेअरमन जयसिंह शंकरराव मोहिते-पाटील यांचे नेतृत्वाखाली कारखाना प्रगतीपथावर वाटचाल करीत आहे.कारखान्याचा सिझन २०२४-२५ चा ऊस गळीत हंगाम दि.१५ नोव्हेंबर रोजी सुरु झाला असून आज अखेर १ लाख २४ हजार ८६० मे.टन ऊसाचे गाळप होऊन १ लाख ०६ हजार क्विंटल साखर पोत्याचे उत्पादन झालेले असून सरासरी साखर उतारा ९.३५ % व आजचा साखर उतारा ९.४० % आहे. सध्या प्रति दिवस ८५०० मे.टन याप्रमाणे ऊसाचे गाळप होत आहे.चालू सिझन २०२४-२५ मध्ये को-जन वीज निर्मिती प्रकल्प दिनांक ७ नोव्हेंबर रोजी सुरु झाला असून आजअखेर १ कोटी ०९ लाख ४५ हजार ०९० युनीट वीज निर्माण झाली असून त्यामधुन ६६ लाख ४६ हजार २१४ युनिट वीज विक्री केलेली आहे.तसेच उपपदार्थ प्रकल्प डिस्टीलरीमध्ये आज अखेर १८ लाख ९४ हजार २१९ लिटर्स रेक्टीफाईड स्पिरीट तसेच १६ लाख ७८ हजार ४५४ लिटर्स इथेनॉल उत्पादन झाले असलेची माहिती कारखान्याचे कार्यकारी संचालक राजेंद्र चौगुले यांनी दिली.

साखर पोती पूजनाचे कार्यक्रमास कारखान्याचे व्हाईस चेअरमन शंकरराव माने-देशमुख, संचालक लक्ष्मण शिंदे, सतीश शेंडगे, विजयकुमार पवार, रावसाहेब मगर, रामचंद्र सिद,विराज निंबाळकर, रावसाहेब पराडे, महादेव क्षिरसागर, गोविंद पवार, सुभाष कटके, जयदिप एकतपुरे, रामचंद्र ठवरे, तज्ञ संचालक, प्रकाशराव पाटील, रामचंद्रराव सावंत- पाटील, संचालिका सुजाता शिंदे, कार्यलक्षी संचालक-रणजित रणनवरे व शिवसृष्टी किल्ला व शिवछत्रपती मल्टिमेडीया लेजर शो कमिटी संचालक पांडूरंग एकतपुरे, बाळासाहेब माने-देशमुख, राजेंद्र भोसले, धनंजय सावंत, सौ.हषार्ली निंबाळकर तसेच कार्यकारी संचालक-राजेंद्र चौगुले व खातेप्रमुख, कामगार युनियन प्रतिनिधी व कर्मचारी वर्ग उपस्थित होते. सदर साखर पोती पुजन प्रसंगी कारखान्याचे चेअरमन जयसिंह शंकरराव मोहिते-पाटील यांचे स्वागत चिफ केमिस्ट एस.एन. जाधव व सत्कार चिफ इंजिनिअर एस.के. गोडसे यांनी केला.

# सोलापूर नगर राजभाषा कार्यान्वयन समितीची सहामाही बैठक संपन्न

**सोलापूर. (कटूसत्य वृत्त):-** जिल्ह्यातील केंद्र शासनाच्या कार्यालयात राजभाषा हिंदीच्या अंमलबजावणीच्या स्थितीचा आढावा घेण्यासाठी नगर राजभाषा कार्यान्वयन समितीच्या वतीने सूर्या एक्झिक्युटिव्हच्या लिलका सभागृहामध्ये सहामाही बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी गृह मंत्रालयाच्या राजभाषा विभागाचे सहाय्यक संचालक राजेंद्र प्रसाद वर्मा, नराकास अध्यक्ष संजीव कुमार, विभागीय रेल्वे व्यवस्थापक नीरज कुमार दोहरे, एनटीपीसी चे मुख्य महाव्यवस्थापक तपन कुमार बंदोपाध्याय आणि सदस्य सचिव विनय प्रसाद साव आदी मान्यवर उपस्थित होते.

बैठकीत केंद्रीय कार्यालयांच्या राजभाषा अंमलबजावणीच्या प्रगतीचा आढावा घेण्यात आला तसेच आगामी काळात हिंदी भाषेच्या प्रचार व प्रसार व प्रगतीसाठी राबवण्यात येणाऱ्या योजनांवर चर्चा करण्यात आली.

नीरज कुमार दोहारे म्हणाले की, रेल्वेच्या विविध विभागांमध्ये हिंदी भाषेचा वापर आणि प्रसार सातत्याने वाढत आहे आणि राजभाषा हिंदीमध्ये चांगले काम सुरू आहे.

तपन कुमार बंदोपाध्याय यांनी एनटीपीसी मधील विविध विभागांमध्ये हिंदी भाषेविषयी होत असलेल्या कामकाजाविषयी माहिती दिली.




राजेंद्र प्रसाद वर्मा यांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा हिंदी भाषेच्या प्रचार व प्रसारासाठी कशा पद्धतीने उपयोगात आणावे याविषयी विस्तृत माहिती दिली.

वर्ष 2023-24 या कालावधीमध्ये नगर राजभाषा कार्यान्वयन समितीच्या वतीने सरकारी कामकाजात हिंदीचा अधिकाधिक वापर करण्यासाठी विविध स्पर्धेच्या माध्यमातून केंद्रीय कर्मचाऱ्यांना प्रेरित करण्यात येत आहे असे संजीव कुमार यांनी सांगितले.

2023-24 या वर्षात राजभाषा हिंदी मध्ये उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल मध्य रेल्वे सोलापूर विभाग, पीएम श्री केंद्रीय विद्यालय, एनटीपीसी लिमिटेड, इंडियन ऑइल कॉर्पोरेशन लिमिटेड, भीमा उपमंडळ केंद्रीय जल आयोग, केंद्रीय संचार ब्यूरो, बँक ऑफ इंडिया, सेंट्रल बँक ऑफ इंडिया, भारतीय जीवन विमा महामंडळ, पंजाब नॅशनल बँक, युनियन बँक ऑफ इंडिया, पावर ग्रिड कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेड, आकाशवाणी केंद्र, राष्ट्रीय डाळिंब अनुसंशोधन केंद्र या केंद्रीय कार्यालय यांना राजभाषा शील्ड व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

14 सप्टेंबर हिंदी दिन आणि हिंदी पंधरवडा निमित्त केंद्रीय कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी 1 ते 15 ऑक्टोबर या कालावधीत ऑनलाईन पारिभाषिक शब्दावली, हिंदी टिपणी व प्रारूप लेखन, वक्तृत्व आणि निबंध लेखन आदी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेतील विजेत्यांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अंबादास यादव यांनी केले आणि आभार दिलीप कुमार यादव यांनी मानले. बैठकीचे प्रास्ताविक सदस्य सचिव विनय प्रसाद साव यांनी केले.

या बैठकीला शहरांतील 30 पेक्षा अधिक केंद्रीय कार्यालय आणि बँकेचे विभाग प्रमुख, राजभाषा अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

# तिवडी यांचे अन्नपूर्णा मिठाई दिवाळी दुबई टूर चा लकी ड्रॉ



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** 50 हजार रू. मिठाई खरेदीवर देण्यात येणाऱ्या कूपन मधून लकी ड्रॉ काढली जाईल व विजेत्याला दुबई टूर चे बक्षीस मिळेल, केवळ एक नाही तर दोन बक्षिसांची अभिनव योजना सोलापूरचे अग्रणी मिठाई, नमकिन आणि बेकरी उत्पादक नंदकिशोर तिवाडी यांच्या अन्नपूर्णा नमकीन मिठाई आणि बेकरी द्वारे घोषित केली.

दिवाळीच्या खरेदीवर दुबई टूर ची -2 बक्षिसे, सोन्याचे नाणे- 2 बक्षिसे, आणि चांदीच्या नाण्याची तब्बल- 100 बक्षिसे अशा भरघोस बक्षिसांची मालिका लकी ड्रॉ पद्धतीने संपन्न होत आहे. रविवार दिनांक 1 डिसेंबर रोजी ही सोडत मान्यवरांच्या उपस्थितीत ' विजापूर रोडच्या, मंत्री चंडक पार्क मधील मयूर क्लासिक AC हॉल येथे सकाळी 11 वाजता काढली जाणार आहे. सर्व सन्माननीय कूपन धारकांना उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात येत आहे. जे सोडतीच्या वेळेस उपस्थित असतील त्यातूनच विजेते घोषित केले जातील.

सदर च्या योजनेस प्रचंड प्रतिसाद मिळाल्याचे नंदकिशोर तिवाडीनी आमच्या प्रतिनिधीशी बोलताना सांगितले. ते पुढे म्हणाले की 1981 पासून ग्राहकांच्या विश्वसनीयतेसाठी आम्ही गुणवत्ता, शुद्धता, स्वच्छता अबाधित राखण्यासाठी अविरत परिश्रम घेतले. आज सुमारे 71%पेक्षा अधिक ग्राहक आमचे खरेदीदार आहेत, याचा आम्हाला अभिमान वाटतो. तसेच दर्जा कायम राखण्यास आमच्या उत्पादन विभागाने बजावलेली कामगिरी. त्यानंतर ग्राहकांशी थेट संवाद साधून ऑर्डर्स आणण्यासाठी साठी परिश्रम केलेल्या मार्केटिंग मॅनेजर शैलेश बजाज व टीम मुळे आम्ही हा पल्ला गाठू शकलो.

95 एफएम रेडिओ चे सचिन खानापुरे हे असल्यानेच ही योजना आखली गेल्याचे श्रेय त्यांना नंदकिशोर तिवाडी यांनी दिले आहे.

# शिक्षकांच्या निवडश्रेणीचा प्रश्न आता लागणार मार्गी सीईओंच्या अध्यक्षतेखाली कमिटी गठीत





**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** वर्षे सलग सेवेनंतर शिक्षकांना देण्यात येणाऱ्या निवडश्रेणीचा विषय मार्गी लावण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांच्या अध्यक्षतेखाली अखेर कमिटी गठीत करण्यात आली आहे. या जिल्हा प्रशासनाच्या निर्णयामुळे जिल्ह्यातील शिक्षकांतून आनंद व्यक्त केला जात आहे.शिक्षक समितीचे जिल्हाध्यक्ष सुरेश पवार यांनी या निर्णयाचे स्वागत केले आहे. जिल्ह्यात २००१-०२ पासून २०२४-२५ या कालावधीत २४ वर्षे पूर्ण झालेल्या सेवेतील आणि निवृत्त झालेल्या शिक्षकांना निवडश्रेणीचा लाभ मिळणे आवश्यक आहे. मात्र, प्रदीर्घ कालावधीपासून प्रलंबित असलेला निवडश्रेणीचा हा प्रश्न शिक्षक संघटनांच्या समन्वय समितीने ऐरणीवर घेतला होता. मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी सोलापूर जिल्ह्यातील प्राथमिक शिक्षक संघटना समन्वय समितीची बैठक जिल्हा परिषदेत आयोजित केली होती. तीन तास चाललेल्या या वैठकीत हा प्रश्न मार्गी लावण्याची आग्रही मागणी त्यांनी केली होती.शिथिल आचारसंहिता होताच निवडश्रेणीचा विषय मार्गी लावण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली कमिटी गठीत करण्यात आली असून प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाधिकारी यांचा यामध्ये समावेश आहे. शिवाय उपशिक्षणाधिकारी रुपाली भावसार यांच्यासह अन्य सात सदस्यांचा यात समावेश आहे. या समितीकडून दर १५ दिवसांनी आढावा घेतला जाईल व वारंवार घेतल्या जाणाऱ्या बैठकीतून निवडश्रेणीचा विषय टप्प्या-टप्प्याने मार्गी लागणार आहे. निवडश्रेणीच्या या अत्यंत जिव्हाळ्याच्या प्रश्नी जिल्हा परिषद प्रशासनाने सकारात्मक पाऊल टाकले आहे. जिल्ह्यातील हजारो शिक्षकांचा रखडलेला हा प्रश्न मार्गी लावण्यासाठी पुढाकार घेऊन या प्रश्नाच्या सोडवणुकीसाठी कार्यवाही सुरू केल्याबद्दल जंगम,शिक्षणाधिकारी कादर शेख यांचे शिक्षक संघटनेच्यावतीने आभार मानण्यात आले.

## शिक्षकांच्या निवडश्रेणीचा प्रश्न आता लागणार मार्गी सीईओंच्या अध्यक्षतेखाली कमिटी गठीत

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** वर्षे सलग सेवेनंतर शिक्षकांना देण्यात येणाऱ्या निवडश्रेणीचा विषय मार्गी लावण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांच्या अध्यक्षतेखाली अखेर कमिटी गठीत करण्यात आली आहे. या जिल्हा प्रशासनाच्या निर्णयामुळे जिल्ह्यातील शिक्षकांतून आनंद व्यक्त केला जात आहे.शिक्षक समितीचे जिल्हाध्यक्ष सुरेश पवार यांनी या निर्णयाचे स्वागत केले आहे. जिल्ह्यात २००१-०२ पासून २०२४-२५ या कालावधीत २४ वर्षे पूर्ण झालेल्या सेवेतील आणि निवृत्त झालेल्या शिक्षकांना निवडश्रेणीचा लाभ मिळणे आवश्यक आहे. मात्र, प्रदीर्घ कालावधीपासून प्रलंबित असलेला निवडश्रेणीचा हा प्रश्न शिक्षक संघटनांच्या समन्वय समितीने ऐरणीवर घेतला होता. मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी सोलापूर जिल्ह्यातील प्राथमिक शिक्षक संघटना समन्वय समितीची बैठक जिल्हा परिषदेत आयोजित केली होती. तीन तास चाललेल्या या वैठकीत हा प्रश्न मार्गी लावण्याची आग्रही मागणी त्यांनी केली होती.शिथिल आचारसंहिता होताच निवडश्रेणीचा विषय मार्गी लावण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली कमिटी गठीत करण्यात आली असून प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाधिकारी यांचा यामध्ये समावेश आहे. शिवाय उपशिक्षणाधिकारी रुपाली भावसार यांच्यासह अन्य सात सदस्यांचा यात समावेश आहे. या समितीकडून दर १५ दिवसांनी आढावा घेतला जाईल व वारंवार घेतल्या जाणाऱ्या बैठकीतून निवडश्रेणीचा विषय टप्प्या-टप्प्याने मार्गी लागणार आहे. निवडश्रेणीच्या या अत्यंत जिव्हाळ्याच्या प्रश्नी जिल्हा परिषद प्रशासनाने सकारात्मक पाऊल टाकले आहे. जिल्ह्यातील हजारो शिक्षकांचा रखडलेला हा प्रश्न मार्गी लावण्यासाठी पुढाकार घेऊन या प्रश्नाच्या सोडवणुकीसाठी कार्यवाही सुरू केल्याबद्दल जंगम,शिक्षणाधिकारी कादर शेख यांचे शिक्षक संघटनेच्यावतीने आभार मानण्यात आले.

# माळशिरस तालुक्यातील भाजप नेते यांचा संकल्प

**माळशिरस (कटूसत्य वृत्त):-** माळशिरस तालुक्यातील भाजप नेते, पुढारी, कार्यकर्ते एकवटले असून, माळशिरस तालुक्यातील नगरपरिषद, ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद निवडणूका माजी आमदार राम सातपुते यांच्या नेतृत्वाखाली लढवणार असल्याचे माळशिरस नगरपंचायतीचे माजी नगराध्यक्ष डॉ.आप्पासाहेब देशमुख यांनी माळशिरस येथे आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत सांगितले.

यावेळी सोपान नारनवर, हनुमंत सुळ, बाळासाहेब सरगर, बाजीराव काटकर, सुजय माने पाटील, बाळासाहेब वावरे, संजय देशमुख, महादेव कावळे, लक्ष्मण गोरव, राहुल मदने, शरद मदने, राहुल पदमन, भैय्या चांगल, शिवराज पोळके, रणजीत ठवरे, रणजीत मोठे, दादासाहेब खरात, रितेश पालवे, संतोष वाघांबरे, देविदास वाघमोडे, लक्ष्मण माने, वैभव शहा, शाहिद शेख, हरिदास पाटील, प्रशांत ताटे, लहू धाइंजे, अंकुश धाइंजे, डॉ. निलेश ननवरे यांच्यासह महायुतीचे नेते, पुढारी, कार्यकर्ते उपस्थित होते.



पुढे बोलताना डॉ.आप्पासाहेब देशमुख म्हणाले, आमचा संकल्प आहे, महायुतीच्या घटक पक्षांना बरोबर घेऊन, माजी आमदार राम सातपुते यांच्या नेतृत्वाखाली, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लढवणार असून, पंचायत समितीवरती महायुतीचा झेंडा फडकवणार असल्याचे त्यांनी सांगितले. पुढे बोलताना डॉ.आप्पासाहेब देशमुख म्हणाले, भाजपचे उमेदवार राम सातपुते यांचा विजय थोडक्यात बाजूला झाला. माळशिरस तालुक्यातील जनता घराणेशाहीच्या मागे नाही तर विकासाच्या मागे आहे हे त्यांनी दाखवून दिले. येत्या काळात जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपरिषदा अशा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सर्वच निवडणुका माजी आमदार राम सातपुते यांच्या नेतृत्वाखाली ताकतीने लढवणार आहे. तर पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नावर बोलताना आप्पासाहेब देशमुख म्हणाले की राम सातपुते यांनी घर विकले नाही ते कोठेही जाणार नाहीत, ते इथले रहिवासी झाले आहेत. पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नावर डॉ. आप्पासाहेब देशमुख म्हणाले, आमदारकीची निवडणूक लढविण्याची संधी मिळाल्यास नक्कीच लढवणार असल्याचे ते म्हणाले. यावेळी महायुतीच्या अनेक पदाधिकारी यांनी आपले मत व्यक्त केले.

## शिक्षणाधिकारी (माध्य) कार्यालयाच्या वतीने महिन्याच्या तिसऱ्या गुरुवारी संवाद दिनाचे आयोजन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** शालेय शिक्षण विभागंतर्गत शिक्षण विभाग माध्यमिक जिल्हा परिषद सोलापूर विभागाकडील मान्यताप्राप्त खाजगी अनुदानित/अंशःत अनुदानित/विनाअनुदानित/कायम विनाअनुदानित सलंग्न सर्व शाळेवर कार्यरत शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या विविध प्रकारच्या तक्रारी व अडचणी असतात. सदर तक्रारी व अडचणी सोडविण्यासाठी जिल्हा स्तरावर मा.शिक्षणाधिकारी माध्यमिक कार्यालयाच्या वतीने महिन्याच्या तिसऱ्या गुरुवारी दुपारी 3.00 वाजता स्थळ - हरिबाई देवकर प्रशाला येथे संवाद दिनाचे आयोजन करण्यात येणार आहे. त्या अनुषंगाने संवाद दिन आयोजन अर्ज स्विकृतीचे निकष प्राप्त निवेदनावर कार्यवाही व इतर अनुषंघीक बाबीचा तपशिल सर्व संस्था/प्रशालेस कळविणेत आलेला आहे. वरील प्रमाणे जिल्हातील सर्व शिक्षक /शिक्षकेत्तर संघटना, इतर शिक्षण विभागाशी निगडीत संघटना यांना आवाहन करण्यात येते कि, संवाद दिना दिवशी उपस्थित राहून आपले निविदेन,व इतरव्यवहार दयावे. तसेच संवाद दिना करीता उपस्थित राहणाऱ्या शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी वरिष्ठांच्या परवानगीने रजा मंजूर करुन घेवून उपस्थित रहावे. असे शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि.प. सचिन जगताप यांनी कळवले आहे.

# आ.पाटलांनी राखला पानवाल्याचा मान स्विकारला सत्कार, प्रेमाने दिलेले पान ही खाल्ले

**माढा (कटूसत्य वृत्त):-** माढ्याचे नवनिर्वाचित आमदार अभिजीत पाटील हे शपथविधी होण्या अगोदरच माढ्यात ॲक्टिव्ह झालेत. माढा दौर्यावर आलेल्या आ. अभिजीत पाटील शहरात दुचाकीवरुन साधेपणाने फिरले.एका पानटपरी चालकाने आ.पाटील यांना थांबवले.पान टपरी वाल्याचा मान राखत आ.पाटील यांनी सत्कार स्विकारला.राजु लवटे या पानटपरी चालकाने आ.पाटलांना पान दिले प्रेमाने दिलेल्या पानाचा स्विकार करीत आ.पाटलांनी खाल्ले.आमदार अभिजीत पाटलांच्या साधेपणाने शहरात अनेकांना भुरळ पडली.



# आगामी निवडणूक पूर्ण ताकदीने लढवू : अनिल सावंत

## राष्ट्रवादीच्या आत्मचिंतन बैठकीत अनिल सावंत यांचे कार्यकर्त्यांना सूचना

**मंगळवेढा (कटूसत्य वृत्त):-** विधानसभा निवडणुकीत झालेल्या पराभवाची जबाबदारी उमेदवार म्हणून मी घेतो. कुठलाही कार्यकर्ता, कुठलाही पदाधिकारी, पक्ष कमी पडला असे मी म्हणणार नाही.कुठलाही सहकारी कमी पडला नाही, पक्षाने मला उमेदवारी दिली, त्यामुळे मी जबाबदारी घेतो. येणारा काळ हा राष्ट्रवादीचा आणि पवार साहेबांच्या पक्षाचा असेल, अशी खात्री राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार अनिल सावंत यांनी कार्यकर्त्यांना दिली. यावेळी माजी पालकमंत्री प्रा. लक्ष्मणराव ढोबळे, रतनचंद शहा सहकारी बँकेचे अध्यक्ष राहुल शहा, मंगळवेढा शहराध्यक्ष चंद्रशेखर कोंडुभैरी आदी प्रमुख उपस्थित होते. राष्ट्रवादी काँग्रेस (श.प.) पक्षाची विधानसभा निवडणुकीतील पराभवानंतर मंगळवेढा येथे विचारमंथन बैठक संपन्न झाली. यावेळी प्रा. लक्ष्मणराव ढोबळे, राहुल शहा यांच्यासह पदाधिकाऱ्यांनी हि मनोगत व्यक्त केले.




यावेळी पुढे बोलताना सावंत म्हणाले कि, लोकसभा निवडणुकीत ज्या प्रमाणे जनता सोबत होती, तशीच जनतेची साथ यावेळी सुद्धा होती, लोकांनी आपल्याला मतदान केलेले आहे, दहा पैकी सात आठ लोकांनी तुतारीला मतदान करणार असल्याचे लोक बोलत होते. विधानसभा निवडणुकीतील हा पराभव कसा झाला, याबाबत अक्खा महाराष्ट्र हळहळतोय, पवार साहेबांचा पक्ष, उद्धव साहेबांचा पक्ष संपवण्याचे हे कारस्थान आहे, असे दिसते. दोन दिवसांपूर्वी पक्षाची बैठक झाली, त्यावेळी पक्षाने नव्या जोमाने पुढे जाण्याचे सांगितले आहे. आज जे वातावरण दिसते आहे, ते पुढील काळात नसेल, आपल्याकडून हा निकाल हिसकावून घेतला आहे, त्यांनी जिंकूनही आनंद साजरा केलेला नाही. आगामी निवडणूक आपण लढवणार आहोत. गावागावात आपण शाखांचे नियोजन करू, आपल्या सुख दुःखात अनिल सावंत, भैरवनाथ शुगर्स परिवार, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आपल्या सोबत असेल अशीही खात्री यावेळी सावंत यांनी दिली.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या विविध सेलचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

श्रीहरी बहुउद्देशीय व संशोधन संस्था, संचलित
शार्वी अभ्यासिका
दि. १५ ऑगस्ट २०२४ पासून आपल्या सेवेत
जुळे सोलापूरातील पहिली अत्याधुनिक अभ्यासिका
वैशिष्ट्ये
✓ वातानुकूलित सुसज्ज इमारत, प्रसन्न वातावरण व माफक फी
✓ शुध्द पिण्याच्या पाण्याची व्यवस्था प्रत्येक जागा आरक्षित
✓ मुलां-मुलींसाठी स्वतंत्र बसण्याची व्यवस्था स्वतंत्र प्रसाधनगृह
✓ दर्जेदार दैनिक वर्तमान पत्रे, मासिके इ. मोफत उपलब्ध
✓ आरामदायी बैठक, डेस्क लॅम्प प्रदुषणमुक्त वातावरण
✓ लॅपटॉप, मोबाईल चार्जिंगसाठी स्वतंत्र पॉईंट मर्यादित प्रवेश क्षमता
✓ वेळोवेळी तज्ञांचे योग्य मार्गदर्शन वाहन तळाची सोय
✓ वर्षभरासाठी नोंदणी करणाऱ्या विद्यार्थ्यांना फीमध्ये सवलत

पत्ता : एफ-३, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर.
संपर्क : (०२१७) २६०५०९१ /८८५६९२७९४७